*कोठारी येथील शहीदा शेख यांचे बाळ दगावल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करावी – पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश*
==================================================================

बल्लारपूर तालुक्यातील कोठारी येथे शहीदा शेख हया महिलेचे बाळ डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे प्रसुती पूर्वीच दगावल्या प्रकरणी त्वरीत सखोल चौकशी करण्यात यावी व या प्रकरणी दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी असे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत.

दिनांक 2 नोव्हेंबर रोजी शहीदा शेख हया कोठारी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसुतीसाठी दाखल झाल्या. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांची दखल न घेतल्याने त्या जिल्हा सामान्य रूग्णालयात उपचारार्थ दाखल झाल्या असता तीन तासापुर्वीच त्यांचे बाळ पोटात दगावल्याचे त्यांना कळले अशी तक्रार जिल्हा परिषद सदस्या सौ. वैशाली बुध्दलवार यांनी पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. ही अतिशय गंभीर बाब असल्यामुळे याप्रकरणाची त्वरीत चौकशी करून घटनेला जबाबदार असलेल्या डॉक्टरांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश सुधीर मुनगंटीवार यांनी दिले आहे.